म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२४८
१६५३



REFBK-0008069
REFBK-0008069

## पुरुषोत्तम शिवराम रेगे

# गंधरेखा

१८५३
वा. २५.
Come

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक

पुरुषोत्तम
शिवराम
रेगे

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
REFBK-0008069
REFBK-0008069
दा. क.

# गंधरेखा

ललित साहित्य प्रकाशन
मुंबई

ललित साहित्य प्रकाशन : ३

गंधरेखा

प्रथमावृत्ति : मे १९५३

मूल्य दोन रुपये
सर्व अधिकार लेखकाचे स्वाधीन

पु. शि. रेगे

यांचीं इतर काव्यपुस्तकें

साधना, १९३१

फुलोरा, १९३७

हिमसेक, १९४३

दोला, १९५०

प्रकाशक :

सौ. सुधा रायकर

सरस्वति निवास

श्रीकृष्ण नगर, बोरीवली, मुंबई

मुद्रक :

वि. पु. भागवत

मौज प्रिंटिंग ब्यूरो

खटाववाडी, मुंबई ४

गंधरेखा १
प्रीत २
सोना ३
फुलें सोलियाचीं ४
फुले केतकी वनांत ५
काळी चंद्रकळा ७
अभिसारिका ८
लिलीचीं फुलें १०
तुझ्याविना ११
माझ्या जिवाच्या पांखरा १२
मीलन १४
निःशब्द वादळ १५
देशांतरींच्या गोष्टी सांगतां १६
हिमसेक १७
उर्वशी १८
पाणोठ्यापाशीं २२
शेवगा २३
वर्षागान २४
पोर आणि कुत्रें २९
अज्ञाताचें गाणें ३१
ठायींठायींचे आक्रोश ३३
मानवा ! ३४
नेले कुंकवाचे धनी ३५
३० जानेवारी १९४८ ३६

३७ पेपर
३८ मध्यरात्रिला
३९ धार
४० प्रवाशाप्रत
४१ अभिसार
४२ रात्र अशी
४३ किनखाब
४४ कमलदलासम
४५ की ?
४६ चित्रागत...
४७ व्रजगौरी
४८ लावण्याला असल्या
४९ कोरुनि मी नभ घेतों
५० विराणी
५१ रात्र असावी
५२ पाहिलें न पाहिलें
५४ भविष्यवादी
५५ तूं हवीस यांत न पाप
५६ त्रिधा राधा
५७ शृंगार
५८ गुज
६१ द्यावें
६२ बेसावध
६३ जग बुडालें, बुडालें
६४ राधा
६६ गाथा

# गं ध रे खा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

या संग्रहांत फुलोऱ्यांतील पांच, हिमसेकमधील नऊ, दोल्यांतील एक आणि १९३८ नंतरच्या प्रसिद्ध झालेल्या पण संग्रहित न केलेल्या अशा ३५ कविता मिळून एकंदर ५० कविता समाविष्ट केल्या आहेत. पहिली कविता सोडून बाकीच्या स्थूल कालानुक्रमानें दिल्या आहेत.

मुखपृष्ठावरील रेखन श्री. द. ग. गोडसे यांचें आहे.

३ मे, १९५३  
१४ हार्वे रस्ता, मुंबई ७

—पु. शि. रेगे

## गंधरेखा

एक आहे झाड माझें
रांठ ज्याच्या जीर्ण शाखा;
साठिषण्मासीं परंतू
लाख येती ज्या शलाका.

झाड माझें लाल ज्याला
आग्रहाचीं लाख पानें;
आणि माझी बंडखोरी
घोषतों मी गात गाणें.

झाड माझें लाखमोली
लाल ज्याला फक्त पानें,
नेणतां ये एक ज्याला
शुभ्र कांहीं जीवघेणें.

एक, ज्याला जाणिवेच्या
लांच्छनाच्या गंधरेखा;
पाहतों मी ज्यांत माझें
झाड, माझ्या आणभाका.

मुंबई, १९५०

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम १५५०५३
विभाग का१०५
क्र. ९२४८
नों. दि. २८/०/५८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ८०५८
शाखा

## प्रीत

भांबावित अशी भग्न-मनाला
कोमलता कां उगा उमलते ?
ठाउक नाहीं का
मुजोर प्रीतीचा हिमार्त वारा
जाळून गेला मनाचा मोहोर ?

लंडन, १९३४

## सोना

सोनफुलांची
रांकट हातीं
जरि सांगड साजेना,

ओंजळ घाली
ठकवुनि जवळी
नउ नवसाची सोना.

बासल ( स्वित्सलंड ), १९३४

# फुलें सोलियाचीं

फुलें सोलियाचीं
ही माझी
फुंकर जादूची
घालितां झणीं
लाख लावितिल कलागती साजणी;
पडल मोहिनी
जन्मोजन्मींची—
फुलें सोलियाचीं.

सले अंतरींची
परि माझी
भाषा सलगीची.
जादुनं झणीं
भारतां कशी दशा ग तव साजणी ?...
जळो मोहिनी—
फुंकर जादूची—
फुलें सोलियाचीं.

मुंबई, १९३५

## फुले केतकी वनांत

फुले केतकी वनांत,
नाग भुले, डुले आंत—
बाळे, भूलोनि राहिला
तोचि तूझ्या ग मनांत.

राहे तुजलि भुलोनि
क्षण विसरे करणी—
'जिव होई चोळामोळा;
नका बोलूं ऐशी वाणी!'

चोळामोळा जिव होई,
परि घातकी जात ही;
जगासंगें नागावाणी
दावा घातला अगाई!

नागावाणी हा जहाल;
मन घाबरें करील—
'नका घेऊं पडताळा;
मन मवाळ बहुल!'

पडताळा जग घेई;
खऱ्याखोट्याची त्या घाई!
कशा यास भुलावण?
मना विचारून पाहीं.

भुलावण घे माघारीं
न दे आसरा अंतरीं.

नाग वसे केतकींत
वैर जगाशीं न धरीं.

फुले केतकी वनांत;
नाग झुले, डुले आंत;
करणीही विसरत—
परि जग विपरीत !

मुंबई, १९३६

# काळी चंद्रकळा

हिरवी ही साडी ल्याली
कांति केशरी खुलली—
कुजबुजऱ्या पानांही
चांपेकळीच वेढिली !

साडी भरजरी लाल
तंग सांवरिते मोल—
टचटचीत टप्पोरं
जणुं डाळिंबीचें फूल !

साडी काळी चंद्रकळा;
आंत चमके चपला—
म्हणुं कुठलें हें फूल ?
जीव फजित हा खुळा !

मुंबई, १९३६

# अभिसारिका

राञ काजळी;
वारा वादळि
भिववी वरचेवरी—
जिवाला भिववी वरचेवरी.

अफाट कातळ
भंवतीं केवळ
भासे पाण्यापरी
मधुनि हें भासे पाण्यापरी.

अन् पांढुरकी
वाट मोडकी
त्यावरि तेजश्छटा—
जणूं ही त्यावरि तेजश्छटा.

अवचित पुढतीं
वळणावरतीं
मूर्त मनोमय फुले—
साजिरें मूर्त मनोमय फुले.

निमिष चमकुनी
जाई कोणी
का ही अभिसारिका—
घिटुकली का ही अभिसारिका ?

" नवल भाससी
सारस हंसी "

सांगूं कैसें तुला—
नाकळे सांगूं कैसें तुला !...

पुन्हा पसरलें
पाणी काळें
उभाच परि मी खुळा—
एकला उभाच परि मी खुळा.

पुणें, १९३६

# लिलीचीं फुलें

लिलीचीं फुलें
तिनें एकदां
चुंबितां, डोळां
पाणी मीं पाहिलें.

लिलीचीं फुलें
आतां कधींहि
पाहतां, डोळां
पाणी हें सांकळे.

मुंबई, १९३८

## तुझ्याविना

सदा सुदिन उगवे
गूढ दुःखें जरी आधीं;
आणि माझी ही वैरीण
रात्र संपेनाच कधीं !

सदा फुलें उमलती
गूढ वेदनांच्या पोटीं;
आणि रिकाम्या हातीं मी
उभी बागेंत एकुटी !

सदा आस एक खुळी
वाट तुझी धुंडाळावी;
आणि आंसवें दाटतां
धरणीच ती फिरावी—

अडखळावें पाऊल,
दिसूं नयेच तें कांहीं...
नाहीं नाहीं रे तरीही
तुझ्याविना कांहीं कांहीं !

मुंबई, १९३८

## माझ्या जिवाच्या पांखरा

माझ्या जिवाच्या पांखरा,
नको अधीर तूं होऊं;
जरा सामसूम होतां
दूर उडून रे जाऊं.

माझ्या जिवाच्या पांखरा,
नको मला बोल लावूं;
देखाव्याला भुललें मी
परि नको रे रागावूं.

माझ्या जिवाच्या पांखरा;
नको कासावीस होऊं;
असें काहूर दाटतां
मन कसें मी थारवूं?

माझ्या जिवाच्या पांखरा,
तुला दूरचि रे ओढ;
परि भुललें मी येथें
नाहीं अंतरींचि जोड.

माझ्या जिवाच्या पांखरा,
आतां एकलेंच नातें;
अदृष्टाच्या गांठीसाठीं
वाट पाहतें, बाहतें.

माझ्या जिवाच्या पांखरा,
आली घटका आपैसा;

साद ओळखीचा येई;
जरा घेईं रे कानोसा.

माझ्या जिवाच्या पांखरा,
आतां नको तूं कचरूं—
नवी धिटाई अंगांत;
जाय उडून पांखरूं!

मुंबई, १९३८

## माझ्या जिवाच्या पांखरा

माझ्या जिवाच्या पांखरा,
नको अधीर तूं होऊं;
जरा सामसूम होतां
दूर उडून रे जाऊं.

माझ्या जिवाच्या पांखरा,
नको मला बोल लावूं;
देखाव्याला भुललें मी
परि नको रे रागावूं.

माझ्या जिवाच्या पांखरा;
नको कासावीस होऊं;
असें काहूर दाटतां
मन कसें मी थारवूं ?

माझ्या जिवाच्या पांखरा,
तुला दूरचि रे ओढ;
परि भुललें मी येथें
नाहीं अंतरींचि जोड.

माझ्या जिवाच्या पांखरा,
आतां एकलेंच नातें;
अदृष्टाच्या गांठीसाठीं
वाट पाहतें, बाहतें.

माझ्या जिवाच्या पांखरा,
आली घटका आपैसा;

साद ओळखीचा येई;
जरा घेईं रे कानोसा.

माझ्या जिवाच्या पांखरा,
आतां नको तूं कचरूं—
नवी धिटाई अंगांत;
जाय उडून पांखरूं!

मुंबई, १९३८

## मीलन

वरतीं
लाल निळी तेजाळ सृष्टि;
इथ ही
हिरवी पिवळी खुलास सृष्टि;
झुळ्झुळ ओहळ;
दूर दूर ये कुठुनि तरि गान...

क्षण कधीं
आकाशधरेचे रंग बदलती—
मळे लाल निळे;
क्षितिज खुले हिरवें पिवळें;
ओहळ जवळ—
पण दूर दूर ये कुठुनि तरि त्याची झुळ्झुळ;
गान दूरचें
हृदयांतच हांसे, नाचे...

दूर तिथें तूं; मी हा येथें—
उसळले परंतु रंग तरंग कधीं काळीं
खेळ तयांचा
आकाशिं, धरेवर, जलांत, गानीं हा.

मुंबई, १९३९

## निःशब्द वादळ

नदी किनारीं
वारा भरारा.
चंचल अंचल.
सांवळी चाहूल.
उरीं थरारे
नवी नव्हाळी.
झुललीं, भुललीं
हृदयें दोन.

नदी किनारीं
वारा भरारा.
गवती पातीं
लपती कांठीं.
तरंग सारंग
पाण्यावरतीं.
उसळे, कोसळे
निःशब्द वादळ.

मुंबई, १९४०

ग्रंथ संग्रहालय, वाचनालय शाखा
१६७०८३
अनुक्रम
क्र. १५८
९२८८
दि. २७/१०/५०

# देशांतरींच्या गोष्टी सांगतां

देशांतरींच्या गोष्टी सांगतां
मधेंच त्याचे शब्द भारावले.
आठवलें कांहीं—
अथांग डोळे... ज्यांत बुडाले
सात समुद्र, अनंत अंबरें.

मुंबई, १९४२

## हिमसेक

सतेज तुझें बोलणें चालणें.
सुकुमार खेळे अंगीं नव्हाळी.
क्षणभर वाटे
अपूर्व जणूं हिमसेक हा
स्वच्छ, निरागस, तेजाळ, विश्रब्ध.

मुंबई, १९४२

## उर्वशी

काळोख चेंगट;
चोहीकडे हें हैराण वादळ;
पुरूरवा आणि उर्वशी एकांतीं—
साधिली वेळा खाशी गंधर्वांनीं !
पळविले मेंढे प्रिय उर्वशीचे.
'धांवा रे, पकडा' एकच हुल्लड.
प्रमत्त धांवतो स्वतः पुरूरवा.
पडे, गडबडे, कोण कोलाहल !
त्यांतच मोठा गडगडाट,
चमके वीज;
झालें राजाचें विवस्त्रदर्शन शय्येबाहेर !
होतांच ऐसा संकेतभंग,
त्यजून राजातें
उर्वशी निघे जाण्या माघारीं.
आवेश, रोष, असहायता,
अमोल क्षणांचीं चपखल शल्यें,
चार वर्षांच्या सहजीवनांतील अतृप्तता—
काहूर एकच दाटून येई.
'उर्वशी, उर्वशी,'
आर्त हांकारित
धांवतो दीन राजा पुरूरवा.

हृदयीं विप्लव.

'उर्वशी, उर्वशी,
फीर माघारीं.'

'दुष्प्राप्य आतां वायुपरी मी.
नको रे, येऊंस जाईं माघारीं !'
तरीहि पुन्हा
'उर्वशी, उर्वशी,'
आर्त हांक अशी.
त्याच हांकेच्या अक्षरांतून
एकेक स्फुरती
प्रियसखीचे गुणविशेष.
विलोल तें लास्य, मादक आव्हान,
लावण्य अम्लान
—हटवाद ऐसा ज्वलन्त अंगीं
नटवूं शके जो खीच एकली !—
युगानुयुगींची विलोभनशक्ति
एकवटून उधळिली जणूं
तपोनिधि श्रीनारायणानें.
आणि वाटलें
मीलन ठरलें अपुरें केवळ
स्वप्नरंजन.

'उर्वशी, उर्वशी,'
हांक पुन्हा अशी.
दस्युवधार्थ सामर्थ्य तुझें
देवांनीं वर्धिलें, दिधलें नद्यांनीं
पयोदान तुला.
पराक्रमाची तुझ्या परिसीमा
साऱ्यांनीं पहावी म्हणूनच ना !

‘उर्वशी, उर्वशी,’
हांक उगा अशी.
रतिकुशला मनोज्ञ तशीच
जाणते ही खरें वीरहृदय.
म्हणते जरी,
‘स्त्रियांचें सख्य नव्हेच तें सख्य—
वृकहृदया त्या,
तशांत कामना परिपूर्ण माझ्या—
जातें माघारीं.’
लावूं नको हे बोल मनाला.
नव्हे हें वैराग्य किंवा नैर्घृण्य—
केवळ बहाणा.
युगानुयुगींचीं स्वप्नबीजें रे,
हिच्यांत आहेत सामावलेलीं
चाळविते ही म्हणून ऐसी.
निर्माणशक्ति ही;
भुले जेथें जेथें निर्माणक्षमता.
अनित्य जें तेथें सनातन ही.
युगकर्ता तूंही;
आहेच तुझें बीज तिच्या पोटीं
ज्यांतून पुढें घेणार जन्म
मनस्वी आयु.
अरे, जोंवर होतास सुकृती
तोंवर तुला वश उर्वशी.
‘उर्वशी, उर्वशी,’
कशाला व्यर्थ आक्रंदितोसी ?
कर्मकुशल योगी जर तूं

मांडिजे यज्ञ सत्वर आतां
सत्त्वरक्षणीं.
तुझ्याच पाशीं
उर्वशी, उर्वशी.

मुंबई, १९४२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८०६९

## पाणोठ्यापाशीं

पाणोठ्यापाशीं खट्याळ मुली गे,
हितवाद तुझा खोटा ऐकला.
त्या वेळीं, कधींहि
नाहीं जें पटलें मनोमनाला,
होतील त्याच्याच कितीक कहाण्या.

मुंबई, १९४२

## शेवगा

दोन प्रहर. निवांत सारें.
श्रमभरानें बाजेवरतीं
                पांगुळलेली तूं.
खिडकीबाहेर ढाळितो चवरी
आसुसलेला शेवगा दारचा.

मुंबई, १९४२

## वर्षागान

आणि कधीं तरी
तुंबळ वायूच्या अट्टाहासांत
परिचित श्री चिरपरिचित
रूप दाविते...

वर्षारंभींच्या संध्यासमयीं
होतास एकदां
डोंगरमाथ्यावर एकला
पहुडलेला तूं;
पिसाट आकाशीं मेघसागर;
वादळीं नौका मनश्चंद्रिकाच
जणूं एकाकी;
आणि एकीकडे
सोरेकाराचें नक्षत्र लोभस...

कितीकदां तूं आहेस म्हटलें
'अन्यथावृत्ति' चित्त तुझेंहि वर्षाप्रसंगीं.
वर्षतां मेघ पुलकित होती
तनु–मनोवृत्ती,
जुनाट मुळें खोल शिरती,
चिर-नूतन सत्त्वप्रचीति
आकिसलय स्फुरवी द्रुम.
अशीच कांहींशी तुझी असावी
अस्फुट अवस्था.
अमित युगांचें जडत्व तुझ्या देहांत भिनतें;
रोम रोम तुझे मुळें धरिती;

विशाल त्रिटप होऊनि राहसी—
अंतरीं अम्लान जीवन-योग
चाले अविरत.
अश्वत्थ जणूं ऊर्ध्वमूल आणि अधःशाख तूं
विश्वसाधर्म्य शिकविणारा.

प्रत्यक्षमुक्ति इच्छितां ऐसीं
चिरबंधनें तुज लाभती...

आणि एकाकीं कोसळे वादळ.
ओघळले सर;
न्हाणुली धरा न्हाऊन फुलली;
खळखळ पाणी चोहोंबाजूला...
तसाच परि तूं पहुडलेला—
वस्त्रेंहि तुझीं चिंब झालेलीं.
आसरा उगाच इथें थोडासा
कलत्या कळ्याचा...
जडत्व भिनलें जरी देहांत
संदीपन आंत दिव्य शक्तीचें
संचार तुझा सलील दूर.
स्थलकालाच्या सापेक्षतेचें
नुरे बंधन
मनुज-जीवनीं स्थित्यंतरें जीं आजवेरी झालीं,
चाललीं आहेत,
पुढील तशीच अंधुक आंखणी—
आविष्कार त्यांचा स्वप्नविचित्र
तुझ्याच जीवनीं दिसून येई.

तुझें तें पहिलें रांगडें स्वरूप;
लहरी निसर्गासवें झुंजतांना
स्वार्थांध, कलहक मानुष-वृत्ति;
पापपुण्याचें बुजगावणें
—समाजसुधारणेसाठीं जें मुळांत—
नैतिक-जीवन आदर्श याची
थोडीशी जाणीव;
आणि क्वचित नवधर्माची नवसंहिता
खरोखर जिचे आजसारख्याहि
भीषण रौरवीं पाठ आशादायी.

कोठून परंतु जीवनीं आशा !
सर्वभक्षक संहारशक्तीनें
प्रलयकालच दाविला जेथें,
परस्परांचा निःपात कराया
मांडिलें जेथें अशेष-युद्ध—
नवीन तंत्र, जाळपोळ आणि
लूटमारीचें,
मानव जेथें मानव-रिपु,
मानव्याचीच चालली होळी.
होय, परंतु
वर्षाकाळचें जलसिंचन
अनादिकालापासून हीच
मानवी आशेची सत्य भूमिका,
प्रतिज्ञापूर्ति,
वरुणदेवाची ऋतस्थापना.
जाणीव ही होतां युगानुयुगींचे,

अदम्य आशेचे,
ओळखीचे सूर घुमूं लागती.
ठायीं ठायीं जे पडसाद त्यांचे
तेच तुझें मग संगीत-सावन,
संहिता-पठण.
कारण याच जाणीवेंतून
येणार आहे पुढील सृष्टि...

तडकते वर जलकणांची संतत धारा;
स्वेदकण हे फुटून येती आंतून वर...
क्वचित एकादा फेनधवल
हंसाकृति मेघ चालतो भासे
झेंप खालती—ज्युपिटर जसा—
उष्ण-मृदुल पिसांच्या गर्दींत
विकल लेडा.
दूर कुठें तरी साद उठती तार उत्कट,
'होईन पांखरूं, घेईन चोचीनें
कमल-तंतू, देठ कोवळे;
तुडुंब तडागीं डुंबत नाचेन—
पंख माझेच जीवनोत्सवीं आहेत ध्वज...!'
जडत्व आतां इतुकें भिनलें
तूं सहसंवादी चराचराचा.
उरल्या नाहींत कांहींच सीमा...
वहाळ, नाले...पाणीच पाणी...
अचल परी मनूसाठीं तूं मत्स्य सत्यसंध
कारण आहे जीवनीं तुला उत्कट आशा.

असें कधीं तरी
तुंबळ वायूच्या अट्टाहासांत
परिचित श्री चिरपरिचित
रूप दाविते...

मुंबई, १९४२

---

ओळ १३ : सोरेकाराचें नक्षत्र = शुक्र तारा. ( सोरेकार = सुराकर )

ओळ ६४ : अशेष-युद्ध = Total War.

ओळी ८७–८९ : ज्युपिटरनें हंसरूपानें येऊन लेडा उपभोगिली, अशी एक ग्रीक लोककथा आहे.

## पोर आणि कुत्रें

पोर कोणी आणि कुत्रें
आज उष्ट्यासाठिं येथें
भांडती हीं दिव्य भूतें !

वल्गाना भावी जगाच्या
घोषवा हें वृत्त तेथें—
स्थान तुम्हां नाहिं जेथें !

कोण तुम्ही ? कां जगानें
मान तो द्यावा तुम्हांला ?
मान ठावें पूर्ण त्याला !

आजवेरी हात खोटा
एक तोंडीं वा कपाळा—
हात कां द्यावा तुम्हांला ?

क्षुद्रवृत्ती, क्षुद्रकीर्ती
तेच तुम्ही हो अपेशी
संस्कृतीचे या मिराशी !

याचना कां व्यर्थ आतां ?
कां कुणाला दोष खोटा ?
काय तुम्हां लाभ-तोटा ?

भोगवृत्ती जेथ नाहीं
लोपती संवेदनाही—
सत्य तेथें त्याग नाहीं !

त्याग तुम्हां वाटला जो
मात्र जाणा थंड झाल्या
भावना निढांवलेल्या !

* * *

पोर कोणी आणि कुत्रें
आज उष्ट्यासाठिं येथें
भांडती हीं दिव्य भूतें !

घोषवा हें वृत्त घोर—
घोषवा हें वृत्त तेथें
पूर्ण मेलेले न जेथें.

मुंबई, १९४३

# अज्ञाताचें गाणें

क्षीणपुण्य कुणि जन्मा आला
विशाल भोगुनि स्वर्लोकाला—
त्रिवार होऊं द्या जयघोष !

जीवन त्याचें कुणी मापलें ?
कुणि वा म्हणणें त्यास आपुलें ?...
कां अपशकुनी अट्टाहास ?

प्राक्तन अपुलें घेऊनि आला
म्हणूं; जरासें राबवुं त्याला—
किंतु नको होईल वेहोष !

दास परि नका सदा राबवूं;
नाच रंग द्या मधुनि उचलवूं—
खेळणीं हवीं हा नच दोष.

अन्याय कधीं, कधीं विसंगति
भ्रमविल आणिक त्याची जैं मति,
नव्या जगाचा करूं आक्रोश !

उत्कटता वा आग्रह दिसतां
चिथावणी देऊंहि तत्त्वतां—
'मूर्तिमंत', म्हणतिल, 'आवेश !'

लीलेनें परि मनें पोखरुनि
एकच देऊं विग्रह उठवुनि—
'हा, हा', म्हणतिल, 'सत्यानाश !'

अंतकाळची नशा जोंवरी
असा ओढवुनि घेउं तोंवरी
अनंत काळाचाही रोष !

काय हरपलें ? काय गवसलें ?
मेळ घालण्या कोण बैसलें ?
मग खेद कशाचा वा हर्ष ?

मुंबई, १९४३

## ठायींठायींचे आक्रोश

ठायींठायींचे आक्रोश
आम्हां संगीताची धन;
पाट वाहती रक्ताचे
रंगवाया हें जीवन;

त्रस्त जीवाची हेळणा
आम्हां केवळ कहाणी;
आपआपुलें मरण
सुखें पाहतों डोळयांनीं...

विटंबिल्या या जीवनीं
वठवितों या नकला;
कुणी प्रमाथी तेजतां
आम्ही उजळीतों कला.

मुंबई, १९४५

# मानवा !

समुद्र करितों अहो मी रिते;
डोंगर देतों उलथुन परते;
मीच वर्षतों अमृतधारा;
पुन्हा फुलवितों हरित-पिसारा.

अवकाशाची कोंडी फोडुन
देतों सारे सूर्य पिटाळुन;
सूर्य पुन्हा मी आपण होउन
नित्य नव्यानें करितों वर्धन.

पिसाटापरी तांडव मांडित
वातचक्र मी येतों घुसळित;
वनांत चंचल शीळ घालितों,
जनांत कुजबुज करीत फिरतों.

सुखदुःखाचीं गुंफुन नातीं
काळाच्याही सीमेवरतीं
दिवसहि रात्री त्याच पाहतों,
त्याच नसांतुन तसा वाहतों.

आजवरी हा माझा चाळा;
मलाहि माझा हेतु न कळला—
वाट पाहतों तुझी मानवा,
देशिल तूं तरि धर्म मज नवा !

मुंबई, १९४७

## नेले कुंकवाचे धनी

नेले कुंकवाचे धनी;
नेलें पोर तेंही एक;
विटंबिली काया कोणीं...
काय आतां सुखदुःख!

समाधान करायला
थोर मायेस्त जमले,
नाहीं ललाटीं लिहिलें
ज्यांना चुकवितां आलें!

ज्यांना ठाऊक केवळ
एक जगाची रहाटी,
कसें कळावें थोरांना
नाहीं माया माझ्या पोटीं?

कसें कळावें कुणाला
नाहीं माया आतां पोटीं,
नाहीं तुटत आंतडें
पतीसाठीं, पोरासाठीं?

पुरे झाले धिंडवडे...
विटंबिली काया त्यांनीं;
नका विटाळूं हें मन
थोर तुमच्या शब्दांनीं!

मुंबई, १९४७

# ३० जानेवारी १९४८

माझ्या, तुमच्या, भोंवतालच्या
वृत्ति हराया अन्यायाच्या
क्षीण दिलें मीं जें आवाहन
आलां ऐकुन बांधुन कंकण—
नका देउं हो मला देवपण;
तुमच्यांतिल मी, माझा कण-कण.

दुःखांतहि जें दिव्य पाहिलें
तेंच मला आशास्पद गमलें,
सजवूं निघतां त्यांतुन जीवन,
माझ्यासंगें फिरलां वणवण—
नका देउं हो मला देवपण;
तुमच्यांतिल मी, माझा कण-कण.

सदा-सर्वदा सर्वांभूतीं
सत्य वसे जें एकच अंतीं,
त्या सत्याचे माझे निशिदिन
तुम्हीच होतां शतकोटिकिरण—
नका देउं हो मला देवपण;
तुमच्यांतिल मी, माझा कण-कण.

माझ्यापाशीं माझें उरलें
इतुकें मज तुम्हि अपुलें केलें.
हृदयहि आतां घ्या हो शोधुन
जेथें कांहिं न तुमच्यावांचुन—
तुमच्यांतिल मी, माझा कण-कण;
नका देउं हो मला देवपण.

मुंबई, ३१ जानेवारी १९४८

# पेपर

रोज सकाळीं चहा पितांना
हवा चवीला खरपुस पेपर,
चेतवितो जो विश्वचि सारें,
विरघळतो जो पापण्यांचवर;

कामाला जातांना अमुची
ज्यांत शिदोरी, जंतरमंतर;
गर्दीमध्यें, क्यूमध्यें जो
जनां-मनांतिल सरकवि अंतर.

रविवारीं पण दे रे, बाप्पा,
पेपर कांहीं दुजा नवीन;
'शकुंतला' जो नाचनाचवी,
हिरोशिमाला जोडि हिरॉइन;

पडल्या पडल्या बिछान्यावरी
नवलाईच्या गोष्टी सांगुनि,
वृत्ती खुलवी दीन, हावऱ्या;
शिळ्या कढीला देइ फोडणी.

मुंबई, १९४८

## मध्यरात्रिला

मध्यरात्रिला होळपलेलीं
घरें पांगुनी बसलीं ओळिंत;
टवाळ रस्ता शिष्टपणानें
जरा लांबला—जणूं तिऱ्हाइत.

कवायतीच्या आणि मिषानें
उभे दिव्यांचे खांब कडेला;
शुष्क देउनी एक जांभई
छपरांवरती वारा निजला. . .

मध्यरात्रही उलटुन गेली;
शिजलीं अंगें, गाद्या भिजल्या;
रात्रीच्या अन् धर्मासाठीं
हव्यात पुन्हा खिडक्या मिटल्या !

मुंबई, १९४८

# धार

चवड्यांवर टेकुन
घेऊन भांडें सावध दोन्ही मांड्यांत
ही धार काढिते
पोर सांजची हिसळत घुसळत तंद्रींत.

ती उभी तुष्टशी
हिरव्या पिवळ्या आठवणींना चघळीत
अन् बसल्या बसल्या
हिच्याहि कांहीं दाटुन येई पोटांत.

मुंबई, १९५०

# प्रवासाप्रत

रे, नको निघूं तूं वादळामधें;
पण शांत सकाळीं उन्हाळ्यांतल्या
जा पाण्याकांठीं नांगरलेल्या होडीपाशीं.
होडींत एकदां, नको करूं तूं विचार: कोठें ?
भरपूर संकटें भेडसावितिल तुज तेथें.

संगीताचीं प्रभातसूक्तें, हालवून तुज जागें केलें
हिम सिंचाया ज्यांनीं, वा झाड तसें तें पोरच कवळुन धरलेली,
हवेंच तुज विसराया. रे, नको करूं तूं आधिंच घाई
शमवाया अपुली तहान तिथल्या शांत जळीं;
नको विचारूं : होइल कैसें पूर्ण हृदय हें ?

अन् तिनसांजेला—रंग जियेचे नाजुक, दृश्य जियेचें फसवें—
पाणी जेव्हां तुला विंबतें,
कर विचार : टिकेल का हें पाषाणासम बहुत काळ पण,
डोळेही जेव्हां नवे उसासे थांबतील टाकायाचे,
विरेल किंवा बेपर्वाइंत काळोखांत ?

वरतीं, खालीं मायावी त्या पहा हवेंत :
उथळ तळें तव पायापाशीं, कांच तयाची
करणार न कांहीं तुज आतां; आणि तरीही
नभांत तेथें वरतिं तुझ्या काढितात पक्षी
वर्तुळें विक्राळ पुन्हा एकलेपणाचीं.

मुंबई, १९५०

---

हॉवर्ड मॉस यांच्या एका कवितेचें रूपांतर.

# अभिसार

मी पुन्हा पुन्हा जाईन तिथें
मग म्हणोत कांहीं खुशाल ते !

भल्या पहांटे तशीच उठुनी,
जरा फावतां भर माध्यान्हीं,
संध्याकाळीं डोळा चुकवुनि,
धीट रात्रिची अभिसारातें
मी पुन्हा पुन्हा जाईन तिथें.

अवचित जेथें वाट थांबते,
गिरकी घेउनि पाणि थबकतें,
आकाशाचें पान न हलतें,
फुलतें, सलतें हृदय हें जिथें
मी पुन्हा पुन्हा जाईन तिथें.

नक्षत्रांचीं उधळित कोडीं,
ठकवुनि मलाच म्हणतो वेडी,
गाफिल माझा जिथें सौंगडी,
घडिभर जेथें विश्व रांगतें
मी पुन्हा पुन्हा जाईन तिथें.

मुंबई, १९५०

# रात्र अशी

रात्र अशी
भलतें सांगत येइ पिशी;
आणि पुन्हा
नको हव्या त्या दावि खुणा.

मधुनि कुठें
फडफड वाऱ्यावर उमटे;
आणि पुन्हा
गडद सांवल्या भावति ना.

खोल इथें
जळांत माझें मन बुडतें;
आणि सुना
कांठावरती मीच पुन्हा.

मुंबई, १९५०

# किनखाब

रसरसत्या ओठांत तुझ्या
चुचकारिसि लपवें गीत;
किनखाबी राजस डोळे
शिलगाविसि वर ऐटींत.

ओठांवर त्याही पुढचें
गे घेउनि भिववित, भीत,
किनखाबी असले डोळे
ही धुंडित हिंडे प्रीत.

ओठांवर धगत्या ऊन
चल घे तर जडवुनि गीत;
किनखाबी झांकुनि डोळे
यश दे, घे, सांडुनि रीत.

मुंबई, १९५०

# कमलदलासम

कमलदलासम तुझ्या पाकळ्या
मिटतां मिटतां पुन्हा उघडिसी;
मावळतीला भाद्रपदांतिल
तुझेच गहिरे रंग लुटविसी;

मदिरेच्या प्याल्यांतिल उरल्या
थेंबासम तूं उसवुन झरसी;
लुप्त कधींच्या ताऱ्यासम अन्
प्रकाश मागें विसरुन जासी;

स्वच्छंदाचें गाणें उधळुन
शब्दांतच तूं अडकुन पडसी;
गळयां-मळयांतिल मिठि उस्कटतां
व्रणांत ओठावरच्या छपसी.

मुंबई, १९५०

# का

वक्षावर जे घन धादावति
डोळयांत तुझ्या लपविसि का ?
ओटिपोटिची शराब गाळिसि
गालांवरल्या खळींत का ?

छटा नितंबावरच्या जुळविसि
ओठांवर जांभुळांत का ?
मनां-मनांतिल लांच्छन जपसी
हनुवटिवरल्या तिळांत का ?

मुंबई, १९५०

## चित्रागत...

चित्रागत ती सारस जोडी;
कमळें कांहीं मिटतीं, उघडीं;
किंचित् हिरवळ तळ्याकांठची;
दुपार कलती ग्रीष्मामधली;
मोर केकती दूर कुठें तरी...

सारें उरांत सांठवायचें--
आठवायचें
डोळ्यांनीं
पुन्हा पुन्हा अन् कधीं तरी...
भरलेल्या या डोळ्यांनीं !

मुंबई, १९५०

# व्रजगौरी

व्रजगौरी तूं कधीं अकल्पित येशी अमुच्या घरा...
ओटीवर मी उभा एकटा लाज-लाजुनी पुरा !

गमे 'यशोदामाइ' पुकारिसि,
हळूच पाउल आंत टाकिसी,
पडदा सारिसि जरा बाजुला
क्षणभर जेथें यमुनेमधल्या ज्योतींचा फुलवरा.

थबकसी, जराशी घुटमळसी,
चपखल पुन्हा हात विसाविशि
आंत त्या तिथें प्रवाह जेथें
जरा डुचमळे घाटापाशीं यमुनेचा बावरा.

जवाबासहि न अवसर देसी,
ठरवुन कांहीं मागें वळसी,
उंबरठ्याशीं पायरिवर अन्
यमुनेच्या डोहांतिल कमळें लाल रोविशी जरा.

मुंबई, १९५०

## लावण्याला असल्या

लावण्याला असल्या असण्याचा हक्कच ना;
प्रश्नेंतच फक्त तयें उजळावें. आणि पुन्हा
जळतांना, घडवावी प्रतिमा निस्तुल काळ्या
काळ्या पाषाणांतुन शब्दांतुन थिजलेल्या—
निजलेला चेंगट जो खर्व-युगें भूगर्भीं,
थिजलेला खोल हृदीं, उरला जो संदर्भीं.

छिन्नीला या माझ्या एक अुकी धार असे,
शब्दाला अर्थ उष्ण. मूढे, तुज सांगुं कसें ?

मुंबई, १९५०

## लावण्याला असल्या

लावण्याला असल्या असण्याचा हक्कच ना;
प्रज्ञेंतच फक्त तयें उजळावें. आणि पुन्हा
जळतांना, घडवावी प्रतिमा निस्तुल काळया
काळ्या पाषाणांतुन शब्दांतुन थिजलेल्या—
निजलेला चेंगट जो खर्व-युगें भूगर्भीं,
थिजलेला खोल हृदीं, उरला जो संदर्भीं.

छिन्नीला या माझ्या एक अुकी धार असे,
शब्दाला अर्थ उष्ण. मूढे, तुज सांगुं कसें ?

मुंबई, १९५०

## कोरुनि मी नभ घेतों

कोरुनि मी नभ घेतों
झाडांच्या हातांनीं,
वदन तुझें अलवालें
या माझ्या हातांनीं;

फुसलावुनि अन् घेतों
मातीच्या ओठांनीं
संथ तळ्यांतिल पाणी,
डोळ्यांतिल तव गाणीं.

मुंबई, १९५१

# विराणी

ही दो हृदयांचि कहाणी
जी शापुनि गेलें कोणी;

ही चार भुजांची गाथा
जी विस्कटली...अन् आतां

ही सर्वस्वाची मिळणी,
ही एकच एक विराणी.

मुंबई, १९५१

## रात्र असावी

रात्र असावी चंचल, मोकळि,
मउ जवसाच्या फुलासारखि,
वारवधूच्या हृदयासारखि,
हलकीफुलकी,
रहस्य जीचें ओठांवर पाकळींत दुमत्या,
डोळयांत जरा पापणिपाशीं.

रात्र असावी स्निग्ध, एकटी,
काळयाकभिन्न डोहासारखि,
पुरंध्रिच्या जणुं हृदयासारखि,
सुजाण, अनुभवि,
रहस्य जीचें कुशींत, पोटीं, मवाळ ओठीं,
डोळयांभंवतीं वर्तुळांत अन्.

रात्र असावी सालस, भुरटी,
मोरपिसांच्या झांकिसारखि,
नववधुच्या कीं हृदयासारखि,
स्वप्निल, कातर,
रहस्य जीचें नाठाळ खुळ्या मुठींत दोन,
काकुळतीच्या डोळयांत जरा.

रात्र असावी रात्रीसारखि,
कधीं नसावी भलतीसलती.

मुंबई, १९५१

## पाहिलें न पाहिलें

जें मत्त फुलांच्या कोषांतुन पाझरलें,
निळया लाघवी दंवांत उलगडलें,
जें मोरपिसांवर सांधरलें,
तें—त्याहुनही—आज कुठेंसें
पुन्हा एकदां
तशाच एका लजवंतीच्या
डोळयांमध्यें—डोळयांपाशीं—
झनन-झांजरें मीं पाहिलें...
पाहिलें न पाहिलें.

जें प्राजक्ताच्या पाकळिवर उतरलें,
मदिरेवरच्या निळया गुलाबी फेंसावर महिरपलें,
जें जललहरीवर थरथरलें,
तें—त्याहुनही—आज कुठेंसें
पुन्हा एकदां
तशाच एका लजवंतीच्या
ओठांवरतीं—ओठांपाशीं—
ठिबक-ठाकडें मीं पाहिलें...
पाहिलें न पाहिलें.

जें कलहंसांच्या पंखांवर भुरभुरलें,
सोनेरी निळसर मळया-मळयांतुन शहारलें,
जें पुनवेच्या चांदण्यांत भिजलें, भिजलें,
तें—त्याहुनही—आज कुठेंसें
पुन्हा एकदां

तशाच एका लजवंतीच्या
मानेखालीं—किंचित् वक्षीं—
बहर-बावरें मीं पाहिलें...
पाहिलें न पाहिलें.

मुंबई, १९५१

# भविष्यवादी

ज्यांचा त्यांना धीर असो शतसहस्र वर्षांचा;
मी जगतों प्रतिक्षणाला—
प्रतीक्षणाची महति न मजला.
ते गुलाम इतिहासाचे
संपूर्ण आपुल्या ओळखिचे नेहमिंचे—
हे गुलामच भविष्याचे
धीरशील.
'आज', 'आतां', 'अधुना' ज्यांचा केवळ कच्चा माल,
ज्यावर हे बघती पुढें लुटाया काळ.
भविष्य ज्यांना आज हवें
भविष्यांतहि त्यांच्या 'आज' हवा.

मुंबई, १९५१

# तूं हवीस यांत न पाप

तूं हवीस यांत न पाप;
पण हवि असतांना
नसावीस तूं, नकोच तूं, नाहिंच तूं,
छे छे पापच तूं
यांतच पाप.
तूं हवीस यांत न पाप.

तूं हवीस यांत समर्थन
तूं हवि असण्याचें;
पण हवि असतांना
कशास तूं? कां तूं? तूंच कां ?
छे छे माझि न तूं
यांतच पाप.
तूं हवीस यांत न पाप.

तूं हवीस यांतच परिपूर्ति
तूं हवि असण्याची;
पण हवि असतांना
नव्हतिस तूं, नव्हतों मी, नव्हतें कांहिंच,
छे छे असेल कधिं का असलें ?
यांतच पाप.
तूं हवीस यांत न पाप.

तूं नुसतें बघतांना
हें मज कळे अपाप.

नों. दि.

मुंबई, १९५१

## त्रिधा राधा

आकाश निळें तो हरि
अन् एक चांदणी राधा—
बावरी
युगानुयुगिंची मन-बाधा.

विस्तीर्ण भुई गोविंद
अन् क्षेत्र साळिचें राधा—
संसिद्ध
युगानुयुगिंची प्रियंवदा.

जलवाहिनि निश्चल कृष्ण,
बन झुकलें कांठीं राधा—
विप्रश्न
युगानुयुगिंची चिर-तंद्रा.

मुंबई, १९५१

# शृंगार

कानांत तुझ्या कोरांटी,
गळयांत गुलबाशीच्या गुंजा,
आणि भुजांवर वेल कसलिशी निळी-सांवळी . . .
कौतुक केलें तुझें पाहिजे
या असल्या शृंगारासाठीं.

सहज शोभली असतिस राणी
रानवटांची, रानफुलांची,
रानावनांत जर तूं असतिस गे या वेळीं—
हरखुन जेथें उठते, फिरते
झाडांखालीं, झाडांवरतीं,
मनांतल्या अन् मनापल्याड
उनाड माया रानफुलांची...

परंतु आहे पुन्हा ऐकिलें
कंटक, कंटक हृदय तुझें
त्या रानांतिल, रानांरानांतील दुज्या...
असो कसेंहि मला न पर्वा
मला पाहिजे
कांटेरी त्या हृदयावरतीं
हृदयाचें या फूल जगविलें, जपलें, जागविलें
कौतुक केलें तुझें पाहिजे
असल्या या शृंगारासाठीं.

मुंबई, १९५२

## गुज

होतें मनांतलें गुज
त्याला कसें न कळे
पंख फुटले,
बिलोरी, काटकोनी—
त्याची झकाकीच वेगळीं,
झेंप वाऱ्या-वाऱ्यापुढची पोकळी.
अस्मानाच्या झावळयांत
कोण तारांबळ
सांभाळतां !...

दूर...दूरचें तें गुज
त्याला सारेंच नीटनेटकें, बांधीव, ठाकठीक.
विश्व कसें ? आंखलेलें.
त्यांत आंखीव कार्यक्रम;
राखीव पराक्रम.
मारे दुरून पहातें—
(वेध नको का पुरा ?)
जगणाऱ्यांचें मरण,
जगण्यांतलेंच मरण,
मेलेल्यांचें जीवन—
आंबुल, वातुळ, तुरट, चिवट.
पण दुरूनच हें सारें.
दुरूनच मौज,
ज्ञान, विज्ञान.
मायेचें पलिस्तर
हवें असेंच डावललें, खोललें

परब्रह्माच्या गा भेटीं.
काय कोणाची त्रिशाद
खोड काढील तर्कांची ?
जीवनार्काची आहे हीच अद्यतन पद्धति.
एव्हे ऐशीतैशी—
अमुकाचार्यांची, तमुकहंसांची,
ओंपनिषदांची, भय्‌ब्रलाची, सोहंमदाची,
आणखी कुणाची सांगूं त्याची—
जी खेळत आली रक्तांत आमुच्या
गेलीं सत्तावीसशें वर्षें—
नाहीं थोडींथोडकीं;
आहे जिभेवर उभी पोरासोरांच्याहि...

आतां कोसळूं दे तें गुज
रेताड भूमींत, दगडी चिपांत;
आणि सांगितलें होतें
जरी देवपुत्रानें
नाहीं रुजणार तें बीज
तसल्या त्या भूमींत, तसल्या चिपांत,
जरा पाहूं पडताळा
दगडाचा, रेतीचा, कशाचाहि—
तुमचा, आमुचा.
आज नको निर्वाळा,
हवा जिव्हाळा—
आंतला, बाहेरचा, अधिक आंतला.
कोण कोणाचा बांधला,
कोण चुकलामाकला,

कोण हरला, बुडाला—
हवा साऱ्यांचाहि आम्हीं वेध घेतला...

अस्मानाच्या झावळ्यांत
तेज नाहीं जें मोहरलें
हवें इकडे तिकडे,
आजूबाजूला
विखुरलें,
उधळलें,
खेळविलें.

मुंबई, १९५२

## द्यावें

वाटतें द्यावें-द्यावेंसें, द्यावें तेव्हां,
हरावें, उधळुनि कण कण, निथळत पसरत न-व्हावें, व्हावें;
व्हावें अन् पुन्हा द्यावें.
कुणि जर का सांगितलें :
"नसतेंच कधीं हें असलें;
असलेंच कधीं,
तर तें त्या तिथें
स्वप्नांतच गुंतुन जेथें मन बुडवें,
फसवें हुरळुन वेडावतें,"
स्वप्नांतच गुंतुन पुन्हा
नवनवीन तसलें व्हावें;
द्यावें—
घ्यावें
भरभरून ओंजळ, अंचल मनभावें—
तनमनभावें.

मुंबई, १९५२

# बेसावध

बेसावध,
अंग अंग तव नितळ तसें
गंगेमधलें पाणि जसें;
सावध,
अंग अंग तव नितळ तसें
गडद निळें आकाश जसें.

बेसावध,
अंग अंग तव शिथिल तसें
घाटींत पहाटे ऊन जसें;
सावध,
अंग अंग तव शिथिल तसें
चांदण्यांतले सूर जसे.

बेसावध,
अंग अंग तव निकट तसें
सांवलींत बुडत्या गांव जसें;
सावध,
अंग अंग तव निकट तसें
वाऱ्यानें लपतें शेत जसें.

बेसावध,
अंग अंग तव सजल तसें
रानतळ्यांतिल कमळ जसें;
सावध,
अंग अंग तव सजल तसें
अंग अंग तव सजल जसें.

मुंबई, १९५२

## जग बुडालें, बुडालें

जग बुडालें, बुडालें;
धावा; सर्वस्वाचा नाश !
पापपुण्याचा हिशेब
मग करू सावकाश.

जेथें जावें तेथें परी
पाप दडालें तळाला;
पुण्य दत्त उभें पुढें
उभा सारा गोतावळा.

कोण भयाण प्रसंग
न ये टाळून टाळतां;
पुण्यवंतांनाच झालें
भय पुण्याचेंहि आतां !

जग बुडालें, बुडालें,
टाळा सर्वस्वाचा नाश;
पापपुण्याचा हिशेब
आतां नको सावकाश.

मुंबई, १९५२

# राधा

मी नच इथली;
नव्हतेंच कधीं मी इथली.
मन माझें गुंतुन पडलें
ती सुरावलीहि न इथली.
वाऱ्यावर पाउल माझें,
अन् पानापानावरतीं
थरथरतें हृदयच माझें.
लिजलें,
नभ जळांत जें बिंबलें,
तें जळ या डोळां भिजलें...
नव्हतेंच कधीं मी इथली.

मी राधा;
मी एक तृणाचें पातें;
त्या पात्यावरचा दंवबिंदू;
त्या दंवबिंदूंतिल इंद्रधनू,
मी माझिच बाधा.
मी असून नुरलें उरलें...
नव्हतेंच कधीं मी इथली.

अवचित परि मज शैशव माझें भेटे
अनुपम, लाडेवाडें
झेंपावत कंठीं हात,
गालांवर जुळवित गाल—
ज्या रीत न ठाउक कांहीं,
ठाउक ज्या सारें कांहीं.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
बालनालय शाखा

ती श्यामल मूर्त मनोहर
धरधरून हृदयाशीं मी—
मी हरलें,
मी हरलें, बुडलें, तरलें
जी नव्हतें कधींच इथली.

अन् येतां, जातां, उठतां, बसतां
तें हास्य खेळतें अतां उरीं;
डोळ्यांत नाचती
त्या लास्याच्या लहरी...
जय जय कृष्ण हरी.
जय जय कृष्ण हरी.
तें गोकुळ, त्या गाई, ते मेळे,
ती यमुनेची फुसलावणि,
अन् एकली एक मी राणी.
राणी—
कारण हृदय न पंजर माझें;
मी शकतच नाहीं बांधूं
जग भोंवतालचें,
शब्द कुणाचा—
मी शकतच नाहीं बांधूं
हृदय न पंजर माझें.
अन् नकळे
म्हणुनिच कां तें मधुकोषच ऐसें बनलें...
मी ठायीं ठायीं उरलें;
मी केवळ इथली झालें.

मुंबई, १९५२

## गाथा

कितितरी दिसांनीं श्यामलिच्या तो
सहवासोत्तर शिकला
शरदांतिल उधळया मेघपिसांना
पुन्हा पहावयाला.

मुंबई, १९५३

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
REFBK-0008069
८६९